| | |
|---|---|
| MHWS090015122022 | दाखल दिनांक : २६.१२.२०२२<br>नोंदणी दिनांक : २६.१२.२०२२<br>निकाल दिनांक : १५.०५.२०२६<br>कालावधी : **०३** व., **०४**., **१९** दि. |

**<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. २), मानोरा यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारीः तृष्णा गो. बन्सोड)

**नियमित फौजदारी खटला क्र. २८७/२०२२** **निशाणी क्र.– ८५**

गुन्हयाचा तपशिल

गुन्हा क्र. : ३५०/२०२२

पोलीस स्टेशन : मानोरा पोलीस स्टेशन, मानोरा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अधिकारी, मानोरा तालुका पोलीस स्टेशन, मानोरा |
| अभियोगपक्षातर्फे | विशेष सहा. सरकारी अभियोक्ता– श्री. एम. जी. शर्मा |
| आरोपी पक्ष | शंकर हरीचंद्र राठोड व इतर |
| आरोंपी पक्षातर्फे | विद्वान विधीज्ञ श्री. टी. ए. खान पटेल |

**<u>गुन्हयाचा तपशिल</u>**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | १०/०६/२०२० ते २०/०१/२०२२ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | २७/०६/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २३/१२/२०२२ |
| दोषारोप निश्चित तारीख | ०१/०७/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २७/०९/२०२३ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | १५/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | –– |

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | जेलमध्ये बंद असलेला कालावधी –कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **शंकर हरिचंद्र राठोड**<br>वय : ३६ वर्षे, धंदाः शेती | कलम ४१(१) सी.आर.पी सी. प्रमाणे समजपत्र दिले. | -- | भा.दं.वि. चे कलम ४९८ (अ), सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष सोडले | -- | -- |
| २. | **अनुसया हरिचंद्र राठोड**<br>वय :६० वर्षे, धंदाः घरकाम | | -- | | | | |
| ३. | **सौ. तिलोतमा हिरासिंग जाधव**<br>वय : ४० वर्षे, धंदाः नोकरी<br>रा. कामठी, नागपुर,ता.कामठी जि.नागपुर. | | -- | | | | |
| ४. | **गोपाल हरिचंद्र राठोड**<br>वय : ३२ वर्षे, धंदाः मजुरी<br>आ.क्र.१, २ व ४ रा. विठोली, ता.मानोरा, जि.वाशिम. | | -- | | | | |

## न्या य नि र्ण य

(पारित केल्याचा दिनांक १५/०५/२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८–अ सह कलम ३४ नुसार न्यायप्रविष्ठ आहे.

**सरकार पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की,**

**२.** फिर्यादी नामे सौ. आश्वीनी शंकर राठोड ही आ.क्र.१ ची पत्नी असुन इतर आरोपी हे आ.क्र.१ चे नातेवाईक आहेत. तिचे लग्न आ.क्र.१ सोबत दि. १०/०६/२०२० रोजी संपन्न झाले. लग्नानंतर फिर्यादी गर्भवती असतांना आ.क्र.३ ने आ.क्र.१ ला ती दिसायला चांगली नाही, तिच्या आईला रेल्वेकडून खुप पैसा मिळाला आहे, त्यांना पाच लाख रुपयाची मागणी कर असे सांगत होती. त्यामुळे आ.क्र.१ हा फिर्यादीसोबत वाद करायचा मारहाण करुन गर्भ पाडून टाकण्याकरीता शारिरीक व मानसिक त्रास देणे सुरु केले. आ.क्र.२ ही फिर्यादीला

अश्लील भाषेत शिवीगाळ करुन तिचा मानसिक छळ करीत होती. त्यामुळे फिर्यादी तिच्या माहेरी निघून गेली. तिच्या बाळंतपणामध्ये आ.क्र.१ तिला भेटायला आले नाही. उलट पाच लाख रुपयाची मागणी करीत होते व बाळ त्याचे आहे किंवा नाही हे सिद्ध करण्यास सांगत होते इतर आरोपी हे आ.क्र.१ ला भडकावित होते. त्या अनुषंगाने फिर्यादीने मानोरा पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली.

३. पोलिसांनी आरोपींविरुध्द गुन्हा क्र.३५०/२०२२ प्रमाणे भारतीय दंड संहिताचे कलम ४९८–अ सहकलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविला. तपासिक अंमलदार यांनी साक्षीदारांचे बयाण नोंदविले व तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द भा.दं.वि. चे कलम ४९८–अ सह कलम ३४ अन्वये नि.क्र.२१ वर दोषारोप निश्चित केले. आरोपींना दोषारोप वाचुन व समजावून सांगितला असता त्यांनी तो अमान्य केला व प्रकरण सुरु ठेवण्याची तयारी दर्शविली. आरोपींची जबानी निशाणी क्र. २२ ते २५ वर आहे. सरकारपक्षाने आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी एकूण सहा साक्षीदार, सा.क्र.१ सौ.अश्वीनी शंकर राठोड (फिर्यादी) यांना नि.क्र.३६ वर, सा.क्र.२ अनुसया श्रीचंद जाधव (फिर्यादीची आई) यांना नि.क्र.४३ वर, सा.क्र.३ चेतन श्रीचंद जाधव (फिर्यादीचा भाउ) यांना नि.क्र.४५ वर, सा.क्र.४ नारायण माणिकराव राठोड (साक्षीदार) यांना नि.क्र.५१ वर, सा.क्र.५ नरेंद्र वसराम चव्हाण (साक्षीदार) यांना नि.क्र.६२ वर व सा.क्र.६ संजय कनिराम राठोड (तपास अधिकारी) यांना नि.क्र.७२ वर तपासले आहे. तसेच सहा. सरकारी अभियोक्ता यांनी पुढे कुठलेही साक्षीदार तपासायचे नसल्याचे कथन केले. त्यानंतर आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे, कलम ३१३(१)(ब) नुसार बयाण नि.क्र.८१ ते ८४ वर नोंदविण्यात आले.

५. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**६.** सरकार पक्षाचे हकीकत व आरोपींचा बचाव यावरुन निराकरणासाठी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष, कारणमीमांसासह खालीलप्रमाणे आहेः–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, लग्नानंतर ते दि.१०/०६/२०२० रोजीपासून ते तक्रार दाखल करेपर्यंत ग्राम–विठोली, ता. मानोरा जि.वाशिम येथे आरोपींनी आपसी संगणमत करुन फिर्यादी हिचेकडे रुपयाची मागणी करुन तिचा शारिरीक, मानसिक छळ करुन तिला क्रुर वागणुक दिली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ४९८(अ) सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| २. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्रमांक १ बाबतः–**

**७.** सा. क्र. १ अश्वीनी ही या प्रकरणातील मुळ फिर्यादी साक्षीदार आहेत. त्यांनी नि.क्र.३६ वर असे कथन केले की, लग्नानंतर ती आरोपींच्या एकत्रित कुटुंबात नांदावयास गेली होती. लग्नाच्या दिड महिन्यानंतर ती गर्भवती राहीली. आ.क्र.३ ही आ.क्र.१ ला फिर्यादीकडून रुपये आणण्याची मागणी करीत होती. तेंव्हापासून फिर्यादीचा तिचे पतीसोबत वाद सुरु झाले होते. आरोपींनी तिला मारहाण करुन तिचा शारिरीक व मानसिक छळ रुपये ५ लाख करीता केला होता. आरोपी तिला रुपये आण नाहीतर गर्भपात कर असे म्हणत होता. तिची सासुही तिला अश्लील शब्दात शिवीगाळ करुन माहेरवरुन वरील रक्कम आणण्याची मागणी करीत होती व पुढे बाळ आरोपीचे नसुन डि.एन.ए टेस्ट कर असे म्हणत होते. त्यामुळे तिने तक्रार नि.क्र.३७

व ४० प्रमाणे दाखल केली. सा.क्र.२ ते ५ फिर्यादीचे नातेवाईक असुन सा.क्र.२ व ३ फिर्यादीची आई व भाउ असुन त्यांनी घटना फिर्यादीने सांगितलेप्रमाणे कथन केली आहे. सा.क्र.४ व ५ यांनी कथित घटना फिर्यादीच्या आईच्या सांगण्यावरुन कळाल्याचे सांगितले. सा.क्र.६ तपास अधिकारी यांनी प्रस्तुत गुन्हयाचा तपास करुन समोपदेशनाचे दस्ताऐवज मिळविले, साक्षीदारांचे बयाण नोंदविले व इतर दस्त हस्तगत करुन आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

८. अभिलेखावरील पुराव्याचे सुक्ष्म अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, फिर्यादीस कथित मारहाण व दुखापत झालेबाबत पुरक वैद्यकिय दस्त अभिलेखावर दाखल करण्यात आले नाही. तसेच फिर्यादी व इतर साक्षीदारांच्या पुराव्यावरुन फिर्यादीने कथन केलेली घटना योग्य पुराव्या अभावी निःसंदेहपणे सिद्ध झालेली नाही. फिर्यादीचे पुराव्यावरुन निश्चीत कोणत्या आरोपीने काय छळ केल्याची बाब पुरक पुराव्या अभावी सिद्ध झालेली नाही. दुसरे साक्षीदार योगेंद्र यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्याने त्यांना अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आले नाही. अभियोग पक्षास पुरेपुर संधी देवूनही त्यांनी इतर स्वतंत्र साक्षीदार यांना साक्षकामी हजर केले नाही. तसेच फिर्यादी व इतर साक्षीदारांच्या उपलब्ध पुराव्यावरुन आरोपींनी फिर्यादीस कथित त्रास, मारहाण करुन तिला क्रुर वागणुक देवून रक्कमेची मागणी केल्याची बाब सिद्ध झालेली नाही.

९. अभिलेखावर उपलब्ध पुराव्यावरुन कथीत घटनेचे दिवशी व वेळी आरोपींनी आपसी संगणमताने फिर्यादी हिचेकडे रुपयांची मागणी करुन तिची शारिरीक व मानसिक छळ केल्याचीबाब फिर्यादी व इतर साक्षीदारांचे पुरक पुराव्या अभावी सिद्ध झालेली नाही. गुन्ह्याचे घटक सिद्ध करण्याइतपत पुरक पुरावा अभिलेखावर आला नाही. अभिलेखावरील पुरावा आरोपींवरील दोष सिद्ध करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी देण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ बाबतः–</u>**

**१०**. अभियोगपक्षाने भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८(अ) सह कलम ३४ मधील घटकांची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे आरोपींना दोषी ठरविता येत नाही, म्हणुन आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. करीता वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्र.२ बाबत खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. आरोपी क्र.१ **शंकर हरिचंद्र राठोड,** आ.क्र.२ **अनुसया हरिचंद्र राठोड**, आ.क्र.३ **सौ. तिलोतमा हिरासिंग जाधव** व आ.क्र.४ **गोपाल हरिचंद्र राठोड** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिताचे कलम ४९८–अ सहकलम ३४ अंतर्गत शिक्षेस पात्र अपराध केल्याचे आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या पुर्ततेकरीता जमानत दाखल करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by TRUSHNA GOVINDRAO BANSOD
Date: 2026.05.15 18:44:46 +0530

**( तृष्णा गो. बन्सोड)**

दि. १५/०५/२०२६

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
( न्यायालय क्र.२), मानोरा,

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | – | Smt. R. K. Chavhan (Grade–III) |
| Court | – | (Smt. T. G. Bansod)<br>Jt. CJJD & JMFC, Manora. |
| Date of Judgment/Order | – | 15/05/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | – | 15/05/2026 |
| Judgment/Order uploaded on | – | 15/05/2026 |